मे. तलाठी साहेब मौजे अंगणगाव
ता. येवला यांचे कडेस

विषय : **खरेदीदार म्हणून मालकी हक्काने रेकॉर्डला नोंद होणे कामी**

अर्जदार - सौ. सुनिता संजय कुलकर्णी
रा. सावरगाव ता. येवला

विनंती की,

जि. नाशिक ता. येवलेपैकी अंगणगाव येथील स.नं. ५२३/१ मधील प्लॉट नं. 33 हे श्री. अनिल ... / वगैरे यांचे मालकी हक्कातील आहेत. सदर प्लॉट मी त्यांचेपासून रक्कम रुपये २,२०,०००/- मात्र ऐवजी ता. १७/५/१८ रोजी कायम खरेदीने घेतलेले आहेत. खरेदीखत येवले स. र. कचेरीत दस्त क्र. अन्वये नोंदविलेले आहे. सबब वरील मिळकतीचे रेकॉर्डला मुळ मालकाचे नांव असलेले नांव कमी करुन खालीलप्रमाणे खरेदीदार म्हणून माझे नांव नोंद करणेत यावी हि विनंती.

| स. नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ. मी. | खरेदीदाराचे नांव |
|---|---|---|---|
| ५२३/१ | 33 | १५०.०० | सौ. सुनिता संजय कुलकर्णी |

सोबत सुची क्र. २ ची नक्कल असे मे. सा. जा. ता. २०/५/१८

S.S. Kulkarni

वरीलप्रमाणे खरेदीदारचे नोंद होणेस माझी/आमची पूर्ण संमती आहे, तक्रार नाही.

[signature]

ब ल अ
वस्त क्रमांक १९०२/२००९
९ / ९९

(वि. नि. नमुना क्र. १) (Fin. R. Form No. 1)

सर्वसा. ११३ मई.
Gen 113 me.

मूळ प्रत [ अहस्तांतरणीय ]
ORIGINAL COPY [ NON TRANSFERABLE ]

शासनास केलेल्या प्रदानाची पावती
RECEIPT FOR PAYMENT TO GOVERNMENT

ठिकाण/Place ...येवला... दिनांक/Date ...१७/४/०९...

...सुनिता संजय कुलकर्णी...

Received from ...रा. सावरगाव...

रु./Rs. ...१३५००/-... (रुपये/Rupees) ...तेरा हजार पाचशे मात्र...

on account of ...मुद्रांक शुल्क...

रोखपाल वा लेखापाल
Cashier or Accountant.

( सही/Signature )
दुय्यम निबंधक श्रेणी-१ येवला
( पदनाम/Designation )

SEAL OF THE SUB-REGISTRAR Gr.-I YEOLA

नाव : सुनिता संजय कुलकर्णी
पत्ता : रा. सावरगांव ता येवला
... : —
... : तेरा हजार पाचशे मात्र
२२६१२३८ दि. १७/४/०९
... : १३५००/-
... : - २ दि. १७/४/०९

दुय्यम निबंधक श्रेणी-१ येवला

| मु.वि.क्र. ७.५६ | ॥ श्री ॥ | मु.शु.रु. १३,५००/- |
|---|---|---|

कायम खरेदीखत **अंगणगाव** येथील शिवारातील, येवले नगरपालिका हद्दीतील बिनशेती निवासी प्लॉटचे. प्रत्यक्ष किमत रूपये २,२५,०००/- सरकारी मुल्यांकन रुपये २,२५,०००/- आज तारीख १७/०४/२००९ रोज - शुक्रवार

सौ. सुनिता संजय कुलकर्णी व.व.३८
व्यवसाय - घरकाम रा.: सावरगाव
ता. येवला जि. नाशिक

खरेदी घेणार

SUB REGISTRAR YEOLA
MAH-CERA/01...
भारत INDIA Rs.0013500 PB11127
STAMP DUTY MAHARASHTRA
0171 3SPECIAL ADHESIVE APR 17 2009 महाराष्ट्र

YEOLA

ब स अ
दस्त क्रमांक १९०२/२००९
२ / २१

| | |
|---|---|
| श्री. अनिल भवरलाल लोढा व.व. ३४<br>व्यवसाय - शेती, वैद्यकीय रा. अंदरसुल<br>ता. येवला जि. नाशिक | खरेदी<br>देणार |

कारणे खरेदीखत लिहुन देतो की,
तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुके येवले पैकी **अंगणगाव** येथील शिवारातील, येवले नगरपालिका हद्दीतील बिनशेती निवासी प्लॉट :-

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ. मी. |
|---|---|---|
| ७४ अ/१ | ३३ | १५०.०० |

चतु:सीमा

| पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|
| कॉलनी रोड | प्लॉ.नं. ३४ | प्लॉ.नं. २६ | प्लॉ.नं. ३२ |

येणे प्रमाणे चतु:सीमा पुर्वक बिनशेती निवासी प्लॉट सर्व तदंगभुत वस्तुसह माझे स्वतंत्र मालकीहक्कातील आहे व प्लॉट माझे स्वतंत्र कबजेवहिवाटीस आहे. वर नमुद प्लॉटची विक्री करण्याचा मला पुर्ण हक्क आणि अधिकार आहे. त्याच अधिकारात वर वर्णन केलेला प्लॉट तुम्हास रक्कम रूपये २,२५,०००/- अक्षरी रूपये दोन लाख पंचवीस हजार मात्र ऐवजी बिनशर्त कायमचा फरोक्त खुष खरेदी देवुन सदर प्लॉट तुम्हास समक्ष मोजणी करुन हद्द दाखवुन तुमचे प्रत्यक्ष कबजात दिला आहे. खात्री करुन तुम्ही कबजात प्लॉट घेतला आहे. सबब कबजा संदर्भाने खरेदी देणार व खरेदी घेणार यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

वर वर्णनाचा तुम्हास या लेखाने खरेदी दिलेला प्लॉट परत देणेची अगर घेणेची लेखी अथवा तोंडी बोली नाही. सबब उपभोग वहिवाट तुम्ही तुमचे वंशपरंपरा निरंतर मनमानेल तसा करावा. त्यास आमचेपैकी कोणी हरकत केल्यास त्याचे निवारण स्वत: करु. तुम्हास त्याची तोषीस लागू देणार नाही.

SEAL OF THE SUB-REGISTRAR G-1 YEOLA
दुय्यम निबंधक श्रेणी-१ येवला

| |
|---|
| य ल अ |
| दस्त क्रमांक १९०८/२००९ |
| ३ / ७७ |

वर नमुद प्लॉटचे तुम्ही आता मालक झालेले असल्याने योग्य त्या परवानग्या घेवुन तुम्ही तुमचे ईच्छेनुरुप बांधकाम करावे. आमची तक्रार, हरकत नाही.

सदरचे खरेदीखत खरेदी देणार व खरेदी घेणार यांचेवर व त्यांचेवालीवारसांवर बंधनकारक आहे व राहील. खरेदी घेणार यांनी मिळकतीचे मालकीहक्कासंदर्भाने खात्री करुन घेवुन सदरचे खरेदीखत केलेले आहे.

सदर प्लॉटवर कोणत्याही बँकेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज बोजे नाही. सबब प्लॉट निर्वेध आहे. कोणत्याही स्वरुपाचे कर्ज, बोजे निघाल्यास त्याचे निवारण स्वत: करु. त्याची तोषीस तुम्हास लागु देणार नाही. तुमचे मालकीहक्कास बाधा निर्माण होऊ देणार नाही.

सदर प्लॉट संबंधाने आम्ही तुमचे खेरीज अन्य कोणाबरोबरही दस्तऐवज अथवा व्यवहार केलेला नाही. निघाल्यास त्याचे निवारण स्वत: करु. तुमचे मालकीहक्कास बाध निर्माण होवू देणार नाही.

आज पावेतोचा शेतसारा आम्ही भरला आहे. या पुढील शेतसारा व विकासनिधी तुम्ही भरावा. बिनशेती परवानगी जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांचेकडील पत्र क्र. मह. / कक्ष - ३ / ७/ बि.शे. प्र.क्र. /१६/२००४ नाशिक दिनांक २२/०७/०४ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. तसेच मा. सहाय्यक संचालक नगररचना विभाग, नाशिक यांचेकडील पत्र क्र. बि.शे./ अभिन्यास/ स.नं. ७४ अ/१/ अंगणगाव ता. येवला / ससंना / ९२६ दि. १५/०४/२००४ अन्वये परवानगी मिळालेली आहे. त्याची झेरॉक्सप्रत सोबत जोडली आहे.

**भरणा:-** रुपये २,२५,०००/- दोन लाख पंचवीस हजार मात्र रोख वेळोवेळी घरी साक्षीदारांचे समक्ष सर्वांनी मिळुन घेतला आहे. तक्रार नाही. भरणा दुसरी सोईची मिळकत घेणेसाठी घेतला आहे.

मिळकत न्यायालयीन विषय नाही. खरेदीचा खर्च तुम्ही (खरेदी घेणार यांनी) केला आहे. किमतीचा संपुर्ण भरणा मिळालेला असल्याने पुनश्च कोणत्याही रकमेची मागणी करणार नाही. ७/१२ रेकॉर्डला तुमचे नावे नोंद होणेकामी मदत करु. भविष्यात चुकदुरुस्तीलेख करुन द्यावा लागल्यास तो करुन देवू.

SEAL ... REGISTRAR Gr.-I YEOLA

य ल अ

दस्त क्रमांक 1902/2009

8/11

हे खरेदीखत स्वः संतोषाने लिहुन दिले. तारीख १७/०४/२००९.
सदरचा दस्त खरेदी देणार, खरेदी घेणार यांनी आज रोजी समक्ष हजर राहुन दिलेल्या माहितीवरुन व त्यांचे प्रत्यक्ष सांगणेवरुन दि. ०८/०४/२००९ रोजीचे ७/१२ उताऱ्यावरुन तयार करुन दिलेला असुन तो त्यांना वाचुन दाखविण्यात आलेला आहे. दस्तुर - गो.द. कुलकर्णी

खरेदी देणार Lodha
( श्री. अनिल भवरलाल लोढा )

खरेदी घेणार S.S. Kulkarni
( सौ. सुनिता संजय कुलकर्णी )

साक्षिदार

१) [signature]
सतिश मनोज उबरबीवाले

२) [signature]
सुभेदेव कारवंडे [illegible]

दस्तुर: [signature]

वाचले:-१) श्री. सुरेश भवरलाल लोढा व इतर यांचा अर्ज दि. २७/५/२००४.
२) म.सहाय्यक संचालक,नगररचना विभाग,नाशिक यांचेकडील पत्र क्रं. बि.शे/अभिन्यास/... नाशिक/संसना/... दि. .../४/२००४.

| य ल अ |
| --- |
| दस्त क्रमांक १९२८/२००९ |
| १ / ... |

जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक.
क्र.मह/कक्ष-३/७/बि.शे.प्र.क्र/१६/२००४.
नाशिक दिनांक. २२/७/२००४.

आ दे श.

महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ प्रमाणे व त्याखालील नियमान्वये श्री. सुरेश भवरलाल लोढा व इतर- राहणार अंगणगांव तालुका येवला जि. नाशिक यांना मौजे. अंगणगांव ता. येवला जि. नाशिक येथील स.नं. ७४-अ/१ (पै) प्लॉट क्रं.— चे क्षेत्र १९,९१६.०० चौ.मी. (अक्षरी क्षेत्र एकोणावीस हजार नऊशे सोळा चौ.मि. फक्त ) या क्षेत्रात निवासी या कारणासाठी अकृषिक प्रयोजनासाठी परवानगी खालील अटींवर देण्यांत येत आहे.

शर्ती :

१. महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व त्याखालील नियम व महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियमास (सुधारीत १९७९ चे) अधिन राहून परवानगी देण्यांत येत आहे.

२. परवानादार यांनी आदेशातील प्लॉटचे व सर्व प्लॉटचे विभाजन म. जिल्हाधिकारी यांचे पूर्व संमतीशिवाय करु नये.

३. परवानादार यांनी सदरहू जमिन व त्यावरील बिल्डिंग अथवा बांधकामाचा उपयोग ज्या कारणासाठी अकृषिक परवानगी दिली आहे त्याच कारणासाठी करावा.तसेच सदरहू जमिनीचा किंवा सदरहू जमिनीपैकी काही भागाचा अथवा त्यावरील बिल्डिंगचा अथवा बांधकामाचा उपयोग दुस-या कारणासाठी करावयाचा झाल्यांस यास म. जिल्हाधिकारी,नाशिक यांची लेखी पूर्व संमती घ्यावी. याच कारणासाठी बिल्डिंगचा उपयोग हा संपूर्ण जमिनीचा उपयोग म्हणून मानण्यांत येईल.

४. परवानादार यांनी हा आदेश दिलेल्या तारखे पासून एक वर्षाच्या आंत जमिनीची सुधारणा,मंजूर लेआऊट प्रमाणे म्हणजे रस्ते, ड्रेनेज इ. करावी की, ज्यामुळे जिल्हाधिकारी व संबंधित नगरपालिका यांची संमती राहील. त्याचप्रमाणे सदरहू लेआऊटमधील प्लॉटची मोजणी व रेखांकन सर्व्हे खात्याकडून करुन घ्यावी व जोपर्यंन्त जमिनीची सुधारणा होत नाही तोपर्यंन्त त्यामधील प्लॉटची विल्हेवाट कोणत्याही त-हेने लावू नये.

५. परवानादार यांनी सदरहू जमिनीतील प्लॉटची विल्हेवाट कोणत्याही त-हेने लावली तर परवानादार यांची जबाबदारी राहील की, सदरहू प्लॉटची विक्री किंवा विल्हेवाट ही आदेशातील शर्तीस अधीन राहून अथवा सनदेमधील शर्तीस अधीन राहून करावी.

६. सदरहू परवानगी ही देखाव्याच्या नकाशामध्ये दार्खविल्याप्रमाणे ओटयावर बांधकामाप्रमाणे किंवा प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे बांधकामा बिल्डिंगप्रमाणे करण्यांस देण्यांत येत आहे. प्लॅनमध्ये दार्खविल्याप्रमाणे मोकळी जागा ठेवावी.

६अ. ही परवानगी म.सहाय्यक संचालक, नगररचना,नाशिक यांचेकडील पत्र क्रं. संसना/३०६ दि.३/२/२००४ मधील शर्तीस अधिन राहून देण्यांत येत आहे.

७. परवानगीदार यांनी संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/सहाय्यक संचालक/ ग्रामपंचायत/नगररचना यांचेकडून योग्य ती बांधकामाची परवानगी घेतल्यावरच बांधकामास सुरुवात करावी. सदरहू अट ही परवानगीदार यांचेवर बंधनकारक आहे.

८. परवानगीदार यांनी बिल्डिंग प्लॅन हे संबंधित सक्षम अधिका-यांकडून मंजूर करुन घ्यावेत. ज्या ठिकाणी सक्षम अधिकारी नाही, अशावेळी परवानगीदार यांनी महाराष्ट्र जमिन महसूल ( जमीनीच्या वापरात बदल अकृषिक आकारणी ) नियम १९६९ अनुसूची-३ प्रमाणे प्लॅन तयार करुन तो म.जिल्हाधिकारी यांचेकडून मंजूर करुन त्याप्रमाणे बांधकाम करावे.

९. परवानादार यांनी राष्ट्रीय महामार्ग,जिल्हा मार्ग यामधील रस्त्याची सिमा व इमारतीची रांग यामधील व इमारतीची रांग या नियंत्रण रेषा या मधील रस्त्यापासूनचे अंतर महाराष्ट्र जमिन महसूल (जमीनीच्या वापरात बदल अकृषिक आकारणी) नियम १९६९ अनुसूची २ प्रमाणे ठेवावी.

१०. परवानादार यांनी हा आदेश दिल्याचे तारखेपासून एक वर्षाचे आंत मंजूरी दिलेल्या अकृषिक प्रयोजनासाठीच जमिनीचा वापर करावा, अन्यथा अकृषिक परवानगीची मुदत जिल्हाधिकारी यांचेकडून वेळोवेळी वाढवून घ्यावी. तसे न केल्यांस परवानगी रद्द समजण्यांत येईल.

११. परवानादार यांनी अकृषिक प्रयोजनाकरीता जमिनीचा उपयोग सुरु केल्याबाबत अथवा उपयोगात बदल केल्याबाबत एक महिन्याचे आंत संबंधीत तलाठी/ तहसिलदार/ जिल्हाधिकारी नाशिक यांना कळवावे. अन्यथा, परवानादार यांचेविरुध्द महाराष्ट्र जमिन महसूल (जमीनीच्या वापरात बदल अकृषिक आकारणी ) नियम १९६६ (६) प्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

१२. परवानादार यांनी जमिनीचा अकृषिक सारा दर चौ.मि.ला निवासी दर रु. ००.१० पै. या प्रमाणे ज्या अकृषिक कारणासाठी परवानगी दिली आहे, त्याच कारणासाठी आणल्याचे तारखेपासून भरावा. अकृषिक दर हा दिनांक ३१/०७/०५ पर्यंत अंमलात राहील. दि.१/८/०५ पासून सुधारीत अकृषिक दराने येणा-या फरकाची रक्कम भरण्याच्या अटीवर सदरची परवानगी देण्यांत येत आहे.